महाळुंगे M.I.D.C. पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
पत्ता- एम.आय.डी.सी.चौक, चाकण-तळेगाव दाभाडे रोड,
महाळुंगे (इंगळे), ता-खेड, जि-पुणे 410501
मेल आय.डी. pimahalunge.pcpc-mh@gov.in
संपर्क क्रमांक – 7028535323

# प्रेस नोट दिनांक २७/०७/२०२४

**महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन तपास पथकाची धडाकेबाज कामगिरी :- पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये मोटार सायकल चोरी करणा-या गुन्हेगाराकडुन मोटार सायकल चोरीचे एकुण ०३ गुन्हे उघडकीस आणुन एकुण १,००,०००/- लाख रुपये किंमतीच्या तीन मोटार सायकल जप्त**

-------------------------------------------------------------------ooooo---------------------------------------------------

मा. पोलीस आयुक्त, श्री विनयकुमार चौबे सो़, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पिंपरी चिंचवड परिसरातील मोटार सायकल चोरी वर आळा घालण्याकरिता गुन्हयांचे क्राईम मॅपिंग करुन, नाकाबंदी,पेट्रोलिंग करुन तसेच मोटार सायकल चोरीच्या घटना घडलेल्या घटनास्थळावरील सी सी टि व्ही फुटेज पडताळणी करुन गुन्हेगारांचा शोध घेउन मोटार वाहन चोरीच्या गुन्हयांची उकल करण्यासाठी वेळोवेळी सुचना व मार्गदर्शन केले आहे.

त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. नितीन गिते, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पेट्रोलिंग व वेगवेगळया ठिकाणी अचानक नाकाबंदी करून तसेच घटना घडलेल्या ठिकाणी सीसीटिव्ही फुटेज पाहुन आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. मौजे महाळुंगे इंगळे ता. खेड जि. पुणे येथील वोक्सवॅगन कंपनी गेट नं.२ समोरुन दिनांक १५/०७/२०२४ रोजी मोटारसायकल चोरीची घटना घडलेबाबत तक्रार प्राप्त होताच तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळावरील सी सी टि व्ही फुटेज पाहणी केली. त्यावेळी दोन इसम मोटार सायकल नं. एम एच १४ डी वाय ०३०२ हिचा हॅन्डल लॉक तोडुन चोरुन घेवुन जात दिसून आले. महाळुंगे पोलीस ठाणेचे तपास पथकाने आजूबाजूचे सीसीटिव्ही फुटेज पाहात त्यांचा शोध घेतला असता, त्यातील एक इसम हा वोक्स वॅगन कंपनीत दोन दिवस काम करुन काम सोडून गेलेला असल्याचे व त्याचे नाव मोसिम अय्याज शेख, वय २७ वर्षे, धंदा खाजगी नोकरी, रा. खंडोबा माळ, चाकण ता. खेड जि. पुणे मुळगाव - दाताळा, ता. मलकापुर जि. बुलढाणा असे असल्याचे समजून आले. तपास पथकाने त्याचा शोध घेवुन त्यास चाकण येथून शिताफीने त्यास ताब्यात घेतले त्यावेळी त्याचा दुसरा साथीदार आरिफ अफजल शेख, वय २८ वर्षे, धंदा खाजगी नोकरी, रा. खंडोबा माळ, चाकण ता. खेड जि. पुणे मुळगाव - दाताळा, ता. मलकापुर जि. बुलढाणा याचेसह त्याने मोटारसायकल चोरी केली असल्याचे निष्पन्न झाले. त्यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कसून तपास केला असता त्यांचा आणखी दोन मोटारसायकल चोरीच्या गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांचेकडुन १,००,०००/- रुपये किंमतीच्या तीन मोटार सायकल जप्त करुन तीन गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

त्याचेकडुन उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | चोरीस गेलेला माल | किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | महाळुंगे MIDC पोलीस स्टेशन | ४४५/२०२४ बीएनएस ३०३(२) | MH14DY0302 | २५,०००/- |
| ०२ | खेड पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण | ४०६/२०२४ भादवि क ३७९ | MH14BE3746 | ३५,०००/- |
| ०३ | बिबवेवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर | ३६/२०२४ भादवि क.३७९, | MH12QB6432 | ४०,०००/- |
| **एकुण ३ मोटार सायकली जप्त किंमत - १,००,०००/- रुपये** | | | | |

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त सो। **श्री.विनयकुमार चौबे,** मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.वसंत परदेशी,** मा.पोलीस उप-आयुक्त **डॉ. शिवाजी पवार,** सहाय्यक पोलीस आयुक्त **श्री राजेंद्रसिंग गौर** यांचे सुचना व मार्गदर्शना खाली **वरिष्ठ पोलीस निरीक्षक** श्री. नितीन गिते**, सहा. पोलीस निरीक्षक** कल्याण घाडगे, **पोहवा** राजू कोणकेरी, राजु जाधव, अमोल बोराटे, विठ्ठल वडेकर, संतोष चाफळे **पोना** संतोष काळे, किशोर सांगळे, **पोकॉ/** शिवाजी लोखंडे, राजेंद्र खेडकर, संतोष वायकर, गणेश गायकवाड, मंगेश कदम, अमोल माटे यांनी केली आहे.

(नितीन गिते)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे,
पिंपरी चिंचवड